पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२३/०८/२०२३
## दि.२२/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १८३/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक जेष्ठ नागरीक,वय ६३ वर्षे,रा.सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | मझर मुमताज अन्सारी,वय-१८ वर्षे रा.सैय्यदनगर हडपसर पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १९/०८/२०२३ रोजी १३/४० वा.ते १३/४५ वा.चे दरम्यान १६२५,आर्शीर्वाद बिल्डींग समोरील रोडवर सदाशिव पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणाहुन पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना धक्का मारुन,क्या अंकल,क्या हो गया,धक्का लगा तो नाराज हो गये क्या असे बोलुन,त्यांना मिठी मारुन,सांत्वन करण्याचा प्रयत्न करण्याचे बहाण्याने त्यांचे पॅन्टच्या खिश्यात ठेवलेले २०,०००/- रुपये रोख व इतर महत्वाची कागदपत्रे असा ऐवज जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. बी.ए.नानेकर ८८५०५०१५७४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे २४४/२०२३,भादविक २७९,३०४(अ),३३८,४२७,मोव्हेॲक्ट १८४ |
| **फिर्यादी** | सागर वाघुले,वय ४०वर्षे धंदा रा.बिबवेवाडी पुणे |
| **आरोपीत** | पीएमपीएलवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०८/२०२३ रोजी रात्रौ १३/१५ वा. राव नर्सिंग होम पुणे-सातारा रोड,पर्वती,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची पत्नी सौ.स्वप्नाली सागर वाघुले,वय-३८ वर्षे,रा.व्ही/६,स्टेट बँक नगर,व्हीआयटी कॉलेज जवळ,बिबवेवाडी,पुणे ह्या मोपेड गाडीवरुन सदर ठिकाणाहुन रस्ता क्रॉस करीत असताना,यातील नमुद पीएमपीएल चालकाने त्याचे ताब्यातील बस ही बीआरटीचा सिग्लल तोडून,वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,सौ.स्वप्नाली वाघुले हिस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. सीमा मुळीक ८०७००८९१०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५७९/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३४ वर्षे,रा.पर्वती पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०८/२०२३ रोजी १४/५० वा.पुणे-अहमदनगर रोडवर असलेले नोव्हाटेल नावाचे हॉटेलचे बाजुला असलेले बँकचे समोर रामवाडी,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे गाडीसह सदर ठिकाणी थांबले असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना तुमको गाडी ठिक तरीकेसे चलाना नही आता क्या,हमारे गाडी को धक्का मारके इधर आकर रुका है असे म्हणुन मोटार सायकलवरील पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादी यांचे पॅन्टचे खिशात ठेवलेले रोख २५,०००/- रुपये जबरदस्तीने काढुन घेवुन जबरी चोरी करुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अंकुश डेंबाळे ९८२३५५६७१३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३०३/२०२३,भादविक ३९५ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ४५ वर्षे रा.काळेवाडी पुणे |
| **आरोपीत** | चारचाकी वाहनातील सात ते आठ अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०८/२०२३ रोजी ०४/३० वा. किलोस्कर कंपनी खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सदर ठिकाणी सिक्युरिटी सुपरवायझर म्हणुन किलोस्कर कंपनीचे गेट नं. २ येथे कर्तव्य करीत असताना,यातील नमुद इसमांपैकी तीन अनोळखी इसमांनी किर्लोस्कर कंपनीच्या मागील कंपाऊंडच्या वॉलच्या तारा कापुन,भिंतीवरुन येवुन, फिर्यादीस धक्का-बुक्की करून त्यांना खाली बसविले. कंपनीतील सहकारी सिक्युरिटी गार्ड फिर्यादी यांचे मदतीसाठी आले असता,सदर इसमांनी रॉडने सिक्युरिटी गार्ड यांचे पाठीत मारुन,त्यांना धक्का देवुन खाली पाडुन,आम्ही पुर्ण तयारीत आलो आहे,शांत बसा,आम्ही झाडे कापुन निघुन जाऊ असे म्हणुन कटरच्या सहाय्याने कंपनीचे आवारातील एकुण तीन चंदनाचे झाडाचा बुंधा कापुन ११,०००/- रुपये किंमतीची त्यांचे इतर साथीदार यांचे वाहना मध्ये टाकुन घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मानसिंग पाटील, ९९२२००८७६८ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ५८५/२०२३,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | सुरज जाधव,वय २३ वर्षे रा.आळंदी रोड जि.पुणे |
| **आरोपीत** | १.प्रशांत मधूकर वाव्हळ,वय २८ वर्षे रा.इंदीरा वसाहत,गणेश खिंड रोड,पुणे २.ओंकार उध्दव भुजबळ,वय २८ वर्षे,रा.संकल्प पार्क,डी-१,औंध,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/८/२०२३ रोजी रात्रौ ००/३० वा.टाटा मेंट्रो प्रोजेक्ट,पुणे विदयापीठ चौक,बाणेर लेन पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मेट्रोचे कामासाठी सविञीबाई फुले पुणे विदयापीठ चौक या भागात सिक्युरीटी गार्ड म्हणुन काम करीत आहे. यातील नमुद इसम यांनी टाटा मेंट्रो प्रोजेक्टचे पुणे विदयापीठ चौक बाणेर लेन पुणे वरील सार्वजनिक रोडवरील साईटवरचे मेट्रो कामासाठी ठेवलेले लोखंडी प्लेट्स एकुण २२ नग २९,२००/- रुपये किंमतीचे त्यांचे टेम्पो मध्ये चोरी करुन घेवुन जात असताना मिळुन आले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, मोमिन ९८२३११३८९७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**